# प्रेसनोट दि. १७/०३/२०१९

## महाराष्ट्र पोलीस दलातर्फे राजस्थान येथे झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत पुणे शहर पोलीस दलातील पोलीस कर्मचारी सचिन शिंदे हे सुवर्णपदकाचे मानकरी .

दि.२८/०२/२०१९ ते दि. २/३/२०१९ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस दलातर्फे जयपुर राजस्थान राज्य येथे झालेल्या राष्ट्रीय पातळी पोलीस शरीरसौष्ठव स्पर्धेत सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस नाईक **सचिन शिंदे** यांनी ७० किलो वजनी गटामध्ये सुवर्ण पदक पटकावुन महाराष्ट्र पोलीसदल व पुणे शहर पोलीस दलाचे नावलौकिक केले आहे.

सचिन शिंदे यांनी या अगोदर सन २००२ ते २००४ दरम्यान पुणे श्री सुवर्णपदक, सन २००३ ते २००४ चे दरम्यान खालसा युनिवर्सीटी पंजाब, ज्युनिअर मिस्टर इंडिया, सिल्व्हर पुणे, मिस्टर इंडिया सहभाग, जालंधर पंजाब येथे सहभाग घेतलेला आहे. तसेच सन २०१४ मध्ये नाशिक येथे झालेल्या महाराष्ट्र श्री स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकविला आहे.

सचिन शिंदे हे पुणे शहर पोलीस दलात सन २००७ साली भरती झाले असून ते पोलीस खात्याचे काम सांभाळून मिळालेल्या वेळेमध्ये आपले शरीरयष्टी मजबूत तयार करून त्यांनी महाराष्ट्र पोलीसदल व पुणे शहर पोलीस दलाचे नांव उज्वल केले आहे.

सचिन शिंदे यांच्या अलौकिक कामगिरी बद्दल मा. श्री. सुबोधकुमार जयस्वाल, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मा. श्री. के. व्यंकटेशम्, पोलीस आयुक्त पुणे शहर, श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर, श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर, श्री.समीर शेख, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे -१, पुणे शहर, श्री.भानुप्रताप बर्गे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पुणे शहर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

Pune Police

